MHAU050008382024

**नियमित दिवाणी दावा क्र.१४३/२०२४**
**रशिद इनामदार वि. इस्माईल इनामदार व इतर.**

**<u>तात्पुरत्या मनाई हुकूमाच्या अर्जावरील नि.क्र.५ खाली आदेश</u>**

वादी यांनी नि.क्र.५ वर प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादींविरुध्द तात्पुरत्या मनाई हुकूम मिळणेकामी दाखल केला आहे.

२. वादी कथन करतात की, मौजे सुराळा, ता.वैजापुर येथील गट क्र.६२ मधील ४० आर वादीचे मालकी व ताब्यातील क्षेत्रामध्ये जाण्या–येण्यासाठी गट क्र.६१ मधील प्रतिवादी क्र.१ ते ५ याच्या जमीनीच्या पश्चिम बाजुने १० फुट वहिवाटीचा रस्ता असल्याचे घोषीत करुन मिळावे आणि दावा प्रलंबित असताना या रस्त्यावरुन जाण्यासाठी प्रतिवादींनी हरकत अडथळा करु नये. वादींना हा रस्ता राहता येथील न्यायालयात रे.मु.नं.३१३/२०२१ मधील तडजोडीमध्ये वाटपात दि.०९.१०.२०२१ रोजी मिळालेला आहे. हा रस्ता प्रतिवादींच्या शेत जमीनीच्या पश्चिम बाजुने १० फुट वहिवाटीसाठी दिला असुन हा रस्ता पुढे गट क्र.६१ च्या दक्षिण बाजुने डवाळा ते सुराळा या मुख्य रस्त्यास लागतो. वादी रस्त्याचा उपयोग शेतमाल तयार झाल्यानंतर मुख्य रस्त्यास आणण्यासाठी हा रस्ता वापरतात. प्रतिवादी तडजोड पत्रात नमुद केलेला रस्ता असतानाही हरकत अडथळा करतात. सध्या वादींच्या शेतामध्ये ऊसाला तोड आली असुन प्रतिवादी ऊस वाहतुक करण्यास हरकत अडथळा करतात म्हणुन तात्पुर्ता मनाई हुकूम मागितलेला आहे.

३. प्रतिवादी क्र.१ ते ५ **नि.क्र.१२** आणि **१३** वर लेखी म्हणणे दाखल करुन त्यात कथन केले की, वादीने महत्वाच्याबाबी लपवुन ठेवुन खोटा दावा दाखल केलेला आहे. वादी भांडखोर वृत्तीचा असुन त्याने कोपरगाव न्यायालयात त्याचे आई आणि भावा विरुध्द विशेष दिवाणी दावा क्र.०६/२०२३ दाखल केला तो न्यायालयाने रद्द केलेला आहे. प्रतिवादी चतुःर्सिमा

नाकारतात. वादीने कथन केल्याप्रमाणे हा रस्ता प्रतिवादींच्या शेताच्या पश्चिम बाजुस नसुन पुर्वेला प्रतिवादी आणि रफीक इनामदार यांच्या शेतामधुन १० फुटाचा रस्ता दिलेला आहे. या रस्त्याचा उल्लेख राहता येथील न्यायालयात झालेले तडजोडपत्र रे.मु.नं.३१३/२०२१ मधील वाटपाच्या हुकूमनाम्यामध्ये नाकाशासह नमुद केलेला आहे त्यामुळे वादीचा तात्पुर्ता मनाई हुकूमाचा अर्ज रद्द करण्यात यावा.

**४.** वादीचे विधीज्ञ श्री.अमोल भुसारे आणि प्रतिवादींचे विधीज्ञ श्री.सैय्यद यासर अली यांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुतचा अर्ज आणि अभिलेखावरील कागदपत्रे तसेच युक्तीवाद विचारात घेता, खालील प्रश्न माझ्या विचारार्थी निघालेले असुन, सदर प्रश्नांवर स्पष्टीकरण देवुन मी उत्तरे नोंदवित आहे.

| अ.क्र. | प्रश्न | उत्तरे |
|---|---|---|
| **१.** | वादींच्या लाभात प्रथमदर्शनी केस आहे काय ? | नाही. |
| **२.** | न्यायाचा तराजु वादींच्या बाजुने झुकतो आहे काय ? | नाही. |
| **३.** | तात्पुरता मनाई हुकूम न दिल्यास वादींचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे काय ? | नाही. |
| **४.** | आदेश काय ? | अर्ज नामंजुर करण्यात आला. |

**<u>का र ण मि मां सा</u>**

**प्रश्न क्र.१ ते ४ करीता :-**

**५.** मुद्दा क्र.१ ते ४ एकमेकांशी संबंधित असल्याने कथनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी मी मुद्दा क्र.१ ते ४ ची कारणमिमांसा एकत्रीतपणे करीत आहे.

**६.** दोन्ही विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. दोन्ही बाजुंच्या वतीने पक्षकारांचे या पुर्वी राहता येथील न्यायालयामध्ये झालेल्या तडजोडीमध्ये वाटप होत असताना प्रत्येक पक्षकाराला मिळालेला

हिस्सा आणि त्या हिस्याला दिलेला रस्ता नकाशासह नमुद केलेला आहे. वादग्रस्त रस्त्याचा उल्लेख ७/१२ उतारा गट क्र.६२ च्या इतर हक्कामध्ये फेरफार क्र.४११२ ला या रस्त्याचा उल्लेख केलेला आहे. वादीस त्याच्या गट क्र.६२ मध्ये जाण्या–येण्यासाठी गट क्र.६१ मधुन १० फुट रस्ता वाटपात दिलेला आहे.

**७.** प्रतिवादींनी वादी रशिदला अशा प्रकारे रस्ता दिल्याचे मान्य केलेले आहे परंतु रस्त्याचे नेमके ठिकाण मान्य नाही. वादीच्या कथनानुसार हा रस्ता प्रतिवादींच्या शेत मिळकतीच्या पश्चिम बाजुला आहे तर प्रतिवादींच्या म्हणण्यानुसार हा रस्ता प्रतिवादी आणि रफिक ईनामदार यांच्या शेत मिळकतीमधुन म्हणजेच पुर्वेकडुन दिलेला आहे. प्रतिवादींचे कथन मी वर नमुद केल्याप्रमाणे तडजोड पत्रातील नकाशाप्रमाणे जुळून येते. वादीला तडजोडपत्रानुसार पुर्व बाजुला रस्ता दिलेला असतानाही तो प्रतिवादींच्या पश्चिमेकडील रस्ता त्याच्या सोईनुसार मागत असल्याचे दिसुन येते, जे योग्य नाही. सर्व पक्षकारांनी त्यांना तडजोड पत्रात नमुद केल्याप्रमाणे दिलेल्या रस्त्याचा वापर केला तरच विनाअडथळा सर्वांना सोईस्कर शेत जमीनीची वहिती करता येईल. वादींची मागणी प्रथमदर्शनी चुकीची आहे. वादीला पर्यायी रस्ता असल्यामुळे या अस्तित्वात नसलेल्या नविन रस्त्याची गरज नाही त्यामुळे वादीच्या बाजुने कायदेशीर उपाययोजना करणे आवश्यक दिसुन येत नाही. प्रस्तुत दावा निकाली निघेपर्यंत वादीला मनाई हुकूमाची गरज दिसुन येत नाही. वादीने चुकीच्या कारणास्तव अर्ज केल्यामुळे खर्च लावणे आवश्यक आहे. वरील सर्व गोष्टी पाहता मी प्रश्न क्र.१ ते ३ चे उत्तर नकारार्थी नोंदवुन प्रश्न क्र.४ करिता खालील आदेश करत आहे.

**<u>आ दे श</u>**

**१.** वादीचा तात्पुरता मनाई हुकूमाचा अर्ज रक्कम रुपये ५,०००/– खर्चासह नामंजुर करण्यात येतो.

Digitally signed by PISAL DHANANJAY SHRIRAM
Date: 2026.01.23 15:36:44 +0530

दिनांकः– २२.०१.२०२६.

**डी. एस. पिसाळ**

सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर, वैजापुर